# जिल्हा परिषद, सांगली
## सामान्य प्रशासन विभाग

मध्यवर्ती प्रशासकीय इमारत सांगली-मिरज रोड पुष्पराज चौक, सांगली. ता.मिरज.जि.सांगली.
दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७२७२५ Email ID - deputyceosangali@gmail.com

---

जाक्र/साप्रवि/आस्था-१०/कावि/३०४/२३००/२०२५ दि.०८/०४/२०२५

प्रति,

१.खातेप्रमुख (सर्व)
जिल्हा परिषद सांगली,
२.गटविकास अधिकारी /तालुकास्तारीय विभाग प्रमुख,
पंचायत समिती---------- (सर्व)

**विषय-** १०० दिवसाच्या कार्यालयीन सुधारणा विशेष मोहिमेतंर्गत कृत्रिम बुध्दिमत्ता (AI) प्रशिक्षणास उपस्थित राहणेबाबत.

उपरोक्त विषयास अनुसरून १०० दिवसाच्या कार्यालयीन सुधारणा विशेष मोहिमेतंर्गत कृत्रिम बुध्दिमत्ता (AI) प्रणालीबाबत अधिकारी व कर्मचारी यांचे प्रशिक्षण घेणे अनिवार्य करण्यात आलेले आहे. त्याअनुषंगाने कृत्रिम बुध्दिमत्ता (AI) प्रणालीबाबतचे प्रशिक्षण MKCL व **जिल्हा परिषद सांगली यांचे संयुक्त विद्यमाने शुक्रवार दिनांक ११/०४/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता मा. वसंतदादा पाटील सभागृह जिल्हा परिषद सांगली येथे** आयोजित करणेत आलेले आहे.

तरी जिल्हा परिषद स्तरावरील खातेप्रमुख यांना कळविण्यात येते की, आपण आपले अधिनस्त सर्व अधिकारी व कर्मचारी यांना प्रत्यक्षपणे सदर प्रशिक्षणास उपस्थित राहणेबाबत आपले स्तरावरून सूचित करणेचे आहे. **तसेच गटविकास अधिकारी यांनी तालुकास्तरावरील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना व्ही. सी. व्दारे एकत्रितरित्या उपस्थित राहण्याबाबत सूचित करणेचे आहे.** सदर कृत्रिम बुध्दिमत्ता (AI) **प्रशिक्षणासाठी** गटविकास अधिकारी यांनी त्यांचे स्तरावर मोठ्या स्क्रीनची व्यवस्था करावी आणि सर्व अधिकारी व कर्मचारी यांना प्रशिक्षण एकत्रित देण्याची दक्षता घ्यावी.

सदर प्रशिक्षणाचे गांभीर्य लक्षात घेवून सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित राहतील याबाबत दक्षता घेण्यात यावी.

**तृप्ती धोडमिसे (भाप्रसे)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद सांगली**

प्रत- माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर

१. श्री. प्रकाश पोळ, गटविकास अधिकारी (वर्ग-१), पंचायत समिती शिराळा,
२/- आपण सदर कृत्रिम बुध्दिमत्ता (AI) प्रणालीबाबतचे प्रशिक्षण देणेकामी वर नमूद दिनांकास मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणेचे आहे.
२. श्री.विनायक कदम, प्रा. व्यवस्थापक, महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लिमिटेड, शिवाजीनगर, पुणे
३. श्री. पारेमल पाटील, जिल्हा समन्वयक, महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लिमिटेड, शिवाजीनगर, पुणे
२/- आपण सदर कृत्रिम बुध्दिमत्ता (AI) प्रणालीबाबतचे प्रशिक्षण देणेकामी वर नमूद दिनांकास उपस्थित राहणेचे आहे.

**तृप्ती धोडमिसे (भाप्रसे)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद सांगली**